# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन नं. २२७०४४००, २२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org

## सूचना

सर्व नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना कळविण्यात येते की, डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कार सन २०१९-२० करिता जारी केलेले नियम व निकषानुसार पात्र उमेदवारांचे नामांकनाचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक व्यक्तींना परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दि. ३१ ऑक्टोबर २०१९ सायं. ५.३० पर्यंत प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. .डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कारांकरिता खालीलप्रमाणे निकष व नियम राहतील.

निकष –

१) डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्काराकरिता होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे पंजीकृत असणे आवश्यक असून तो कसूरदार नसावा.

२) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र राज्यात किमान २० वर्षे वैद्यकीय व्यवसायात सेवारत असावा.

३) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९५९ अन्वये तयार केलेल्या नितीमत्ता व आचार संहिते मधील तरतूदी अन्वये दोषी ठरलेला नसावा किंवा भारतीय दंड विधान संहितेनुसार दंडीत झालेला नसावा.

४) पुरस्काराकरिता नामांकन प्राप्त झालेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाचे महाराष्ट्र राज्यात होमिओपॅथीचा प्रचार, प्रसार, विकास, शिक्षण व संशोधन यापैकी किमान एका क्षेत्रात मौलिक योगदान असावे.

५) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाने सामाजिक क्षेत्रात केलेले काम व त्याकरिता शासकीय, निमशासकीय किंवा नामवंत नोंदणीकृत संस्थांकडून प्राप्त झालेले पुरस्कार ही अतिरिक्त गुणवत्ता समजली जावी.

नियम – १) परिषदेने जाहिर केलेल्या पुरस्कारांना परिषदेचे संकेतस्थळ व वृत्तपत्रीय बातम्यांद्वारे प्रसिध्दी देण्यात येईल.

२) पुरस्कार प्राप्त व्यक्तींना त्या संबंधीची सूचना स्वतंत्रपणे परिषदेतर्फे दिली जाईल.

३) पुरस्काराचे वितरण, परिषदेने निश्चित केलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या सोयीनुसार वर्ष समाप्तीच्या अगोदर केले जाईल.

४) पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा परिषदेतर्फे पुरस्कार प्रमाणपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव केला जाईल.

५) पुरस्कार विजेत्यांना पुरस्कार वितरण सोहळ्याकरिता येण्या-जाण्या करिता शासनाच्या वर्ग-१ अधिकाऱ्याला लागू असलेल्या शासकीय नियमाप्रमाणे प्रवासभत्ता देण्यात येईल.

डॉ. राजकुमार पाटील
अध्यक्ष
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई १

ठिकाण – मुंबई
दि.- १९ ऑक्टोबर २०१९

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन नं. २२७०४४००, २२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org


## सूचना

सर्व नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना कळविण्यात येते की, डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कार सन २०१९-२० करिता जारी केलेले नियम व निकषानुसार पात्र उमेदवारांचे नामांकनाचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक व्यक्तींनी परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दि. १० ऑक्टोंबर २०१९ साय. ५.३० पर्यंत प्रस्ताव सादर करावेत. डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कारांकरिता खालीलप्रमाणे निकष व नियम राहतील.

निकष -

१) डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्काराकरिता होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे पंजीकृत असणे आवश्यक असून तो कसूरदार नसावा.

२) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र राज्यात किमान २० वर्षे वैद्यकीय व्यवसायात सेवारत असावा.

३) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९५९ अन्वये तयार केलेल्या नितीमत्ता व आचार संहिते मधील तरतुदी अन्वये दोषी ठरलेला नसावा किंवा भारतीय दंड विधान संहितेनुसार दंडीत झालेला नसावा.

४) पुरस्काराकरिता नामांकन प्राप्त झालेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाचे महाराष्ट्र राज्यात होमिओपॅथीचा प्रचार, प्रसार, विकास, शिक्षण व संशोधन यापैकी किमान एका क्षेत्रात मौलिक योगदान असावे.

५) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाने सामाजिक क्षेत्रात केलेले काम व त्याकरिता शासकीय, निमशासकीय किंवा नामवंत नोंदणीकृत संस्थांकडून प्राप्त झालेले पुरस्कार ही अतिरिक्त गुणवत्ता समजली जावी.

नियम - १) परिषदेने जाहिर केलेल्या पुरस्कारांना परिषदेचे संकेतस्थळ व वृत्तपत्रीय बातम्यांद्वारे प्रसिध्दी देण्यात येईल.

२) पुरस्कार प्राप्त व्यक्तींना त्या संबंधीची सूचना स्वतंत्रपणे परिषदेतर्फे दिली जाईल.

३) पुरस्काराचे वितरण, परिषदेने निश्चित केलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या सोयीनुसार वर्ष समाप्तीच्या अगोदर केले जाईल.

४) पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा परिषदेतर्फे पुरस्कार प्रमाणपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव केला जाईल.

५) पुरस्कार विजेत्यांना पुरस्कार वितरण सोहळयाकरिता येण्या-जाण्या करिता शासनाच्या वर्ग-१ अधिकाऱ्याला लागू असलेल्या शासकीय नियमाप्रमाणे प्रवासभत्ता देण्यात येईल.

डॉ. राजकुमार पाटील
अध्यक्ष
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई १

ठिकाण - मुंबई
दि.- ५ सप्टेंबर २०१९